निगराणी

# तूर पिकाचे एकात्मिक कीड आणि रोग व्यवस्थापन




**डॉ. व्ही.एन. सिडाम**
(मो.नं. ९७६६५२९४३६)
विषय विशेषज्ञ (कृषिविस्तार)
**प्रा.डॉ. व्ही.जी. नागदेवते**
कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही, जि. चंद्रपूर
(मो.नं.९४२१८००५९०)




तूर पिकापासून जास्तीत जास्त उत्पादन घ्यावयाचे असेल तर प्रामुख्याने योग्य जमिनीची निवड, अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा वापर, रोपांची हेक्टरी योग्य संख्या, रासायनिक खतांचा संतुलित वापर, आंतरमशागत, पीकसंरक्षणाचे नियोजन, योग्य वेळी पेरणी या बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यामध्ये अधिक उत्पादनशील आणि मररोग प्रतिकारक्षम वाणांचा लागवडीसाठी वापर हा तूर पीक उत्पादन वाढीसाठी सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे.

**तूर** पिकावर विविध रोग तसेच किडींचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे उत्पादन घटून नुकसान होते. हे टाळण्यासाठी करावयाच्या प्रभावी उपायांची माहिती प्रस्तुत लेखात घेऊ.

तुरीवरील हेलिकोव्हर्पाची अळी ही शेंगा पोखरणारी अळी, हिरवी अमेरिकन बोंडअळी या नावाने ओळखली जाते. ही एक बहुभक्षी कीड आहे. हेलिकोव्हर्पाची एक अळी साधारण ७ ते १६ शेंगांचे नुकसान करते. ही अळी नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत अत्यंत क्रियाशील असते. प्रतिझाड एक अळी असल्यास प्रतिहेक्टरी १३८ किलो आणि एका झाडावर तीन अळ्या असल्यास प्रतिहेक्टरी ३०८ किलो इतकी घट उत्पादनात येऊ शकते.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

१) वनस्पतीजन्य कीटकनाशके : पिकास फुलकळी येताना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

२) जैविक कीटकनाशके : एच.ए.एन.पी.व्ही. प्रतिहेक्टर ५०० रोगग्रस्त अळ्यांचा अर्क (१ : १०९ तीव्रता) १० मि.लि. प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे अर्कात मिसळून फवारणी करावी. फवारणी शेतात प्रथम व द्वितीय अवस्थेतील अळ्या असताना केल्यास अतिशय प्रभावी ठरते.

३) रासायनिक कीटकनाशके : तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या हेलीकोव्हर्पा अळीच्या व्यवस्थापनासाठी किडींनी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी गाठल्यानंतर (१० ते २० अळ्या प्रति १० झाडे)



अॅझाडारेक्टिन ३०० पी.पी.एम. ५० मि.लि. किंवा क्विनॉलफॉस २५ मि.लि. किंवा फ्लुबेंडामाईड २० डब्ल्यू.जी. ५ ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब १८.८ ई.सी. ७ मि.लि. इमामेक्टिन बेन्झोएट ५ एस.जी. ४.४ ग्रॅम किंवा क्लोरॅनट्रनिलिप्रोल १८.५ एस.सी. २.५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

तुरीवरील पिसारी पतंग : अळी हिरवट रंगाची, मध्यभागी फुगीर व दोन्ही टोकांकडे निमुळती होत गेलेली व पाठीवर काटेरी लव असलेली असते. लहान अळी कळी, फुले व शेंगांना छिद्रे पाडून खाते. मोठी अळी तुरीच्या शेंगावरील साल खरडून शेंगांना छिद्र पाडून दाणे खाते. अळी शेंगांच्या आत कधीच शिरत नाही.

रासायनिक कीटकनाशके : पिसारी पतंगाच्या ५ ते १० अळ्या प्रति १० झाडे आढळून आल्यास कार्बारिल १० टक्के पाण्यात मिसळणाऱ्या पावडरची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करावी.

तुरीच्या शेंगांवरील माशी : अळी पांढऱ्या रंगाची व गुळगुळीत असते. शेंगमाशीची एक अळी शेंगेच्या आत राहून एका दाण्यावर उपजीविका पूर्ण करते. अळी





शेंगेतील दाणे अर्धवट कुरतडून खात असल्यामुळे दाण्याची मुकणी होते.

नियंत्रण : तुरीवरील शेंगमाशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी., २० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फुलकिडे (थ्रिप्स)** : या किडींची पिल्ले आणि प्रौढ दोघेही पानाच्या खालच्या अथवा वरच्या बाजूस राहून पाने खरवडतात व त्यातून स्त्रवणाऱ्या रसावर उपजिविका करतात.

नियंत्रण : पीक कळी व फुलोरा अवस्थेत असताना निळे चिकट सापळे ५० ते ६० प्रतिहेक्टरी लावावेत तसेच डायोमिथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.लि. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने गरज पडल्यास करावी.

**तुरीवरील प्रमुख रोग व त्यांचे नियंत्रण**

**मर** : हा रोग फ्युजेरियम या जमिनीत वास्तव्य करणाऱ्या बुरशीमुळे होतो. यामुळे पानांच्या शिरा पिवळ्या होतात व पाने पिवळी पडतात. झाडाचे शेंडे मलूल होतात व कोमेजतात. झाड हिरव्या स्थितीत वाढते. जमिनीलगतच्या खोडाचा भाग काळ्या रंगाचा बनतो.

व्यवस्थापन : पिकांची दीर्घकालीन फेरपालट करावी. रोगप्रतिबंधक जाती पेराव्यात. उदा. पी.के.व्ही. तारा, आशा, बी.एस.एम.आर. ३३६, बी.एस.एम.आर. ८५३, आय.सी.पी.एल. – ८७११९. पेरणीपूर्वी मिश्र बुरशीनाशक कार्बोक्झिम ३७.५ टक्के + थायरम





३७.५ टक्के ३ ग्रॅम प्रतिकिलो व ट्रायकोडर्मा व्हीरिडी ४ ग्रॅम प्रतिकिलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

वांझ : हा विषाणुजन्य रोग असून, झाड झुडुपांसारखे वाढते व पानांचा रंग फिक्कट हिरवा दिसतो. पानावर पिवळे गोलाकार ठिपके दिसतात. झाडांवर अत्यंत कमी किंवा मुळीच शेंगधारणा होत नाही. या रोगाचा प्रसार इरियाफाईड कोळ्यांमुळे होतो.

व्यवस्थापन : पी.के.व्ही. तारा, बी.एस.एम.आर.– ७३६, बी.एस.एम.आर.– ८५३ किंवा आशा या वाणांची लागवड करावी. कोळीनाशकाद्वारे कोळ्यांचे व्यवस्थापन करावे.

**खोडावरील करपा**

अ) कोलेटोट्रायकम करपा : हा रोग कोलेटोट्रायकम डिमॅशिअम या बुरशीमुळे होतो. खोडावर, फांद्यांवर काळ्या करड्या रंगाचे चट्टे आढळतात. रोगाची तीव्रता अधिक असल्यास फांद्या व झाडे वाळतात.

व्यवस्थापन : प्रतिबंधक उपाय म्हणून शेतातील रोगट फांद्या व झाडे जाळून नष्ट करावीत.

ब) फायटोप्थोरा करपा : हा रोग फायटोप्थोरा ड्रेसलेरा या बुरशीमुळे होतो. या रोगामुळे पानावर ओलसर चट्टे किंवा खोडावर तपकिरी व गर्द तपकिरी चट्टे जमिनीलगत किंवा जमिनीपासून काही इंच अंतरावर आढळतात. नंतर हे चट्टे वाढत जाऊन खोडाभोवती खोलगट भाग तयार होतो व काही वेळा खोडावर गाठी तयार होतात. पाण्यातून व हवेद्वारे या रोगाच्या बिजाणूचा प्रसार होतो.

व्यवस्थापन : रोगग्रस्त शेतात तसेच पाणी साचणाऱ्या जमिनीत तूर पीक घेऊ नये आणि शेतातील रोगट फांद्या व झाडे जाळून नष्ट करावीत. ■